


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १० एप्रिल १९४६ अंक १५

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

**एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर**

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A, LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL, B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. SC. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी * टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर. B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | “ Cencobank ” | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**ब्रिटिश लष्कराचें नुकसान**—चोरी, अफरातफर, निष्काळजीपणा, इत्यादि कारणांमुळें १९४४ सालीं ब्रिटिश लष्कराने सुमारें २३ कोटि रुपये गमावले.

**कॉंटिनेंटल म्युच्युअल ॲश्युरन्स कं. लि.**—वरील कंपनीस सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडून रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळालें असून ती आतां लवकरच कामास प्रारंभ करणार आहे. श्रीमान बाळासाहेब नाईक, बी. ए., हे कंपनीचे चेअरमन असून श्री. परोपकारे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

**फेडरेशनच्या अधिवेशनांत महाराष्ट्रीयांची कामगिरी**—फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्री ह्या संस्थेचें १९ वें वार्षिक अधिवेशन नवी दिल्ली येथें नुकतेंच पार पडलें. ह्या अधिवेशनास श्री. चं. गो. आगाशे, श्री. ल. म. डहाणूकर, श्री. न. ग. आपटे, श्री. दा. वा. पोतदार, श्री. श्री. म. जोशी, श्री. चिं. त्र्यं. चितळे, श्री. आ. रा. भट, श्री. ग. वि. पुराणिक, श्री. अ. शं. साठे, श्री. दि. वि. केळकर, श्री. स. वा. दातार, वगैरे महाराष्ट्रीय व्यापारी व कारखानदार उपस्थित होते. परिषदेंत श्री. आपटे ह्यांनीं अन्नपरिस्थितीवर, श्री. पोतदार ह्यांनीं फेडरेशनच्या अंतर्गत व्यवस्थेवर, श्री. डहाणूकर ह्यांनीं संरक्षणाच्या धोरणावर व श्री. भट ह्यांनीं निर्यात व्यापाराच्या ठरावावर भाषणें केलीं.

**रबरट्यूब्स व टायर्स वरील कंट्रोल उठला**—ता. २६ मार्च १९४६ पासून रबर ट्यूब्स व टायर्स वरील कंट्रोल सरकारनें उठविला आहे.

**चित्रपट खपविण्यासाठी शेअर्सची खरेदी**—वॉर्नर ब्रदर्स ह्या अमेरिकन चित्रपट कंपनीनें असोसिएटेड ब्रिटिश कॉर्पोरेशन ह्या ब्रिटिश चित्रपट कंपनीच्या एकूण शेअर्सपैकी ३७½% शेअर्स मिळविले आहेत. ब्रिटिश कॉर्पोरेशनच्या नियंत्रणाखाली ४५० सिनेमागृहें आहेत. त्यांत अमेरिकन चित्रपट दाखविण्याची निश्चिति मिळविण्याचा हा प्रयत्न आहे. ब्रिटिश चित्रपटांस अमेरिकेंत प्रसिद्धी मिळविण्यासहि वॉर्नर ब्रदर्स प्रयत्न करूं शकतील, परंतु तूर्त तरी अमेरिकन चित्रपटांचीच इंग्लंडमधील आयात वाढत आहे.

**युद्धविषयक धोक्याचा विमा**—वॉर रिस्क इन्शुअरन्स ऑर्डिनन्सनें ३० सप्टेंबर, १९४५ अखेर हिंदुस्थान सरकारास हप्त्यांचे रूपानें २०,०९,२९,००० रुपये मिळवून दिले. नुकसानभरपाईदाखल सरकारला फक्त ३,०९,००० रुपये द्यावे लागले.


**हिंदुस्थानांतील रेल्वे अधिकारी** — हिंदुस्थानांतील रेल्वेजमध्यें प्रमाणाबाहेर अधिकारी आहेत अशा तक्रारीला उत्तर देतांना वहातुक मंत्री म्हणाले, "असावयास पाहिजेत, त्यापेक्षा रेल्वे खात्यांत अधिकाऱ्यांची संख्या कमीच आहे. सैन्यामध्यें ५० सैनिकांमागें एक अधिकारी असतो, तर रेल्वे खात्यांत एका अधिकाऱ्याच्या हाताखालीं ४५० लोक असतात आणि याचा परिणाम हा होतो कीं, या अधिकाऱ्यांना कागदपत्र चाळतां चाळतां नाकीं नव येतात आणि त्यामुळें वेळेवर गाड्या सोडणें व प्रवाशांची सोय पहाणें ह्या त्यांच्या मुख्य कर्तव्याकडे पहावयास त्यांना फुरसत होत नाहीं."








छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.




पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें







पंढरीनाथ
ब्रिलिअन्टाईन वापरा

# वारसा कराचें स्वरूप

मार्च, १९४६ चे अखेरीस फडणवीस, सर आर्चिबाल्ड रोलँड्स, ह्यांनीं एस्टेट ड्यूटी बिल मध्यवर्ती असेंब्लीमध्यें मांडलें. वास्तविक, मार्च १९४५ च्या पूर्वीच हें बिल पुढें आणण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार होता, परंतु तेव्हांचे फडणवीस सर जेरेमी रेस्मन ह्यांनी नव्या असेंब्लीवरच त्यासंबंधींतील जबाबदारी टाकण्याचें ठरविलें, म्हणून हें बिल पुढें येण्यास बारा महिन्यांचा अवधि लोटला. १९३५ च्या घटनाकायद्यानें मध्यवर्ती सरकारास सक्सेशन ड्यूटी बसविण्याचा म्हणजे वारसाच्या वाट्यास येणाऱ्या मालमत्तेवर कर बसविण्याचा अधिकार दिलेला आहे. ह्या अधिकारामध्यें एस्टेट ड्यूटीचा म्हणजे मरण पावलेल्या मनुष्याच्या मालमत्तेवरील मालकी हक्क दुसऱ्याकडे जातो; ह्या निमित्तानें बसविण्यांत येणाऱ्या मूळ मालमत्तेवरील कराचा समावेश होत नाहीं, असा फेडरल कोर्टानें बहुमतानें निर्णय दिला होता. हिंदुस्थान सरकारास एस्टेट ड्यूटीच्या स्वरूपाचा वारसा कर बसविण्याचा होता, म्हणून त्यानें ब्रिटिश सरकारमार्फत घटना कायद्यांत दुरुस्ती करवून एस्टेट ड्यूटी बसविण्याचा आपला हक्क पक्का करून घेतला आणि त्यास अनुसरून गेल्या वर्षी, वर सांगितल्याप्रमाणें, बिलाची पूर्वतयारी केली. पार्लमेंटानें मध्यवर्ती सरकारास बिगर शेतकी मालमत्तेवर एस्टेट ड्यूटी बसविण्याचा व प्रांतिक सरकारांना शेतजमिनीवर तशाच प्रकारचा कर बसविण्याचा अधिकार दिला आहे.

## लोकशाही कर

वारसा कर, मग तो सक्सेशन ड्यूटीच्या स्वरूपांत असो किंवा एस्टेट ड्यूटीच्या स्वरूपांत असो, जगांतील बहुतेक सर्व प्रगमनशील देशांत बसविण्यांत आलेला आहे. मोठाल्या मिळकती पुढील पिढ्यांना विनाकष्ट मिळाव्यात, ही गोष्ट लोकशाहीस धरून नाहीं. त्याचप्रमाणें, कर देण्याच्या पात्रतेप्रमाणें त्याची आकारणी व्हावी, ह्या तत्त्वास धरूनच वारसा कर असल्याकारणानें लोकशाहीच्या प्रगतीबरोबर वारसाकरहि पसरत चाललेला आहे. हिंदुस्थानांत आतां बसविण्यांत यावयाचा कर लोकशाहीच्या तत्त्वास धरून असला तरी त्याचा मुख्य उद्देश सरकारी वाढत्या आवश्यक खर्चाची तरतूद करणें हाच आहे. म्हणून, वारसा कर बसविल्यामुळें येथें आर्थिक लोकशाही निर्माण झाली आहे, असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

## करास पात्र होणारी मालमत्ता

मृत्यूच्या वेळीं मृत माणसाची मालमत्ता बाजारांत विक्रीस काढली, तर तिची किती किंमत येईल, याचा अंदाज करून त्यावरून मालमत्तेची किंमत ठरविण्यांत येईल. ह्या अंदाज करण्यासाठीं तज्ञ व लायक अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाईल, असें समजतें. मालमत्तेच्या किंमतीसंबंधीं वांधे उत्पन्न झाल्यास ते हायकोर्टाकडे सोपविण्यांत येतील व हायकोर्टाचे निर्णयावरहि अपील राहील. विमापॉलिसीचे बाबत मिळणारी रक्कमही मालमत्तेमध्येंच धरली जाईल व तिचेवर कर बसेल, अशी बिलांत तरतूद आहे. विम्याचे रकमेवर कर बसूं नये, अशी खटपट करण्यांत येणें आवश्यक आहे. वारसा कराचा अंमल सर्व ब्रिटिश हिंदुस्थानवर होईल; तथापि संस्थानांनीहि तसाच कर बसवावा अशी मध्यवर्ती सरकारची अपेक्षा आहे.

## व्यावहारिक प्रश्न

शेतजमिनीवर वारसा कर बसविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देण्यांत आलेला असून बाकीच्या मालमत्तेवरील वारसा कराचा अधिकार मध्यवर्ती सरकारकडे आहे. मध्यवर्ती सरकारनें गोळा केलेल्या कराचा कांहीं भाग प्रांतिक सरकारांत वाटून दिलाच पाहिजे; असें त्यावर बंधन घालण्यांत आलेलें आहे. अशा रीतीनें, कराच्या आकारणीच्या अधिकाराची व जमा होणाऱ्या कराच्या रकमेची वाटणी केलेली आहे. आतां ह्या कराच्या आकारणीचा दर काय असावा, कर बसवितांना मालमत्तेची किंमत कशी ठरविण्यांत यावी, ह्या वाढलेल्या कामाची व्यवस्था कशी करावी, इत्यादि प्रश्न प्रत्यक्ष व्यवहारांत फारच अवघड जाणारे आहेत. लोकांवर खालच्या नोकरवर्गाचा जुलूम व अन्याय होऊं नये, ह्यासाठीं तर सरकारला विशेष तरतूद करावी लागेल.

## मोठ्या मिळकतींवर जास्त कर

एक लक्ष रुपयांपर्यंतच्या मालमत्तेवर कर आकारला जाणार नाहीं व जसजशी मालमत्ता मोठी, तसतसा आकार जास्त, अशा रीतीनें कर वसूल केला जाईल. कराची आकारणी शतमानानें प्रत्यक्ष किती होईल, हा तपशीलाचा प्रश्न आहे. परंतु इनकमटॅक्सच्या तत्त्वाप्रमाणेंच वाढत्या मिळकतीस वाढत्या दरानें वारसा कर द्यावा लागणें हें योग्यच आहे. प्रोबेट, लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन, सक्सेशन सर्टिफिकेट, इत्यादींवर कोर्ट फी ॲक्टाखालीं आजच फीचे स्वरूपांत कर बसविण्यांत आलेला आहे. ह्या फीचा कांहीं जातींवरच बोजा बसतो व फीची आकारणीहि प्रमाणशीर होत नाहीं, अशी हिंदुस्थानांत परिस्थिति आहे. वारसा कर सर्वांवर बसविणें म्हणजे एक प्रकारें वरील फी कांहीं प्रमाणांत सर्वांस लागू करण्यासारखेंच होणार आहे.

## कराचा विनियोग

वारसा कर हा भांडवलावरील कर आहे. तेव्हां त्या कराचा विनियोग सरकारच्या चालू उत्पन्न-खर्चातील तूट भरून काढण्याकडे करणें श्रेयस्कर होणार नाहीं. लोकांनीं बचत केलेल्या भांडवलाचा विनियोग भांडवली स्वरूपाच्या उपक्रमाकडेच करण्यांत आला पाहिजे, म्हणजे त्या खर्चातून पुढें उत्पन्नाच्या बाबी निर्माण होऊन समाजाची संपत्ति वाढण्यास सहाय झालें पाहिजे.

---

## संरक्षणाची तांतडीची व्यवस्था

युद्धकाळांतील उद्योगधंद्यांचा युद्धोत्तर काळींहि टिकाव लागावा, ह्या दृष्टीनें त्यांस द्याव्या लागणाऱ्या संरक्षणाचा विचार टारिफ बोर्डाकडे सोपविण्यांत आला आहे. परंतु, टारिफ बोर्डाच्या शिफारसी हिंदुस्थान सरकारच्या हातीं पडण्यास कांहीं काळ लागणार आहे. ह्या शिफारसी सरकारकडे जातील, त्यावेळीं मध्यवर्ती विधिमंडळाची बैठक चालू नसल्यास, संरक्षणास पात्र असलेल्या उद्योगधंद्यांची कुचंबणा होणार आहे. टारिफ बोर्डाच्या शिफारसी अंमलांत आणणारें बिल विधिमंडळांत मांडावें लागेल व त्यासाठीं पुढील अधिवेशनापर्यंत थांबावें लागेल तर मधल्या काळांत त्या उद्योगधंद्यांचें नुकसान होत राहील. तेव्हां विधिमंडळाच्या संमतीची वाट न पहातां टारिफ बोर्डाच्या शिफारसी अंमलांत आणण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकाराला देणारें एक बिल व्यापार मंत्र्यांनीं असेंब्लींत मांडलें आहे.

---

# स्फुट विचार

### सुस्वागतम्

बुधवार, ता. ३ रोजीं, पाडव्याचे सुमुहूर्तावर घटना कायद्याच्या ९३ व्या कलमानुसार चालू असलेल्या राज्यव्यवस्थेच्या जागीं लोकमतानुवर्ती प्रधानमंडळाच्या राज्यकारभारास मुंबई प्रांतांत प्रारंभ झाला. त्याच दिवशीं रात्रीं पंत प्रधान, श्री. बाळ गंगाधर खेर, ह्यांनीं मुंबई नभोवाणीवरून भाषण करून, प्रधान मंडळाच्या कार्यक्रमाबद्दल थोडी माहिती सांगितली. लांचलुचपतीचे प्रकार थांबवून राज्यकारभारांतील घाण नाहींशी करण्याचा आपला निर्धार त्यांनीं जाहीर केला. शेतकऱ्यांच्या उन्नतीकडे मंत्रिमंडळ विशेष लक्ष पुरवील, हें उघड आहे. दारूबंदीच्या कार्यक्रमाचाहि श्री. खेर ह्यांनीं उच्चार केला. १९३९ सालीं सोडून दिलेले कार्यक्रम नवें मंत्रिमंडळ पुन: हातीं घेणार आहे. नव्या मंत्रिमंडळास आपल्या तपशीलवार योजना आंखण्यास अद्याप वेळ मिळालेला नाहीं. परंतु अन्नपुरवठ्याच्या प्रश्नास त्यांच्या योजनांत महत्त्वाचें स्थान असणें स्वाभाविक आहे. मंत्रिमंडळास विधिमंडळाचा पुरेपुर पाठिंबा आहेच. सामान्य जनतेनेहि त्यास सवड देऊन व त्याचेशीं मन:पूर्वक सहकार करून प्रगतीस हातभार लावावा. श्री. खेर व त्यांचे सहकारी ह्यांस त्यांच्या कार्यांत आम्ही मन:पूर्वक यश चिंतितों.

### इराणमधील रशियन लष्कर

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षितता समितीवर रशियन शिष्टमंडळानें बहिष्कार घातल्यावर सुद्धां इराणमधील रशिअन लष्कराविषयीं चर्चा गेला पंधरवडाभर चालू होती. इराणने हा प्रश्न सुरक्षितता समितीवर आणला होता. आतां रशिआने आपलें लष्कर काढून घेण्याचें आश्वासन दिल्यामुळें ता. ६ मेपर्यंत हा मुद्दा तहकूब ठेवण्यांत यावा असा ठराव सुरक्षितता समितीने अमेरिकन परराष्ट्रमंत्री मि. बर्न्स ह्यांच्या सूचनेवरून मंजूर केला. इराणमध्यें सध्यां चालू असलेल्या घडामोडी समजण्यासाठीं त्याचें भौगोलिक स्थान आणि महत्त्व लक्षांत घेणें जरूर आहे. त्याचबरोबर, तेथील लोकांच्या आर्थिक स्थितीचीहि थोडीशी माहिती करून घेतली पाहिजे. इराण हें डोंगरी पठार आहे. त्यांतील मध्यभाग व दक्षिण भाग पाण्याच्या व पावसाच्या दुर्भिक्षतेमुळें जवळ जवळ कोरडेच आहेत. त्यामुळें तेथील लोकवस्तीहि फारशी नाहीं. इराणच्या उत्तर, वायव्य व नैर्ऋत्य भागांत मात्र दाट लोकवस्ती आहे. त्यांतल्या त्यांत कॅस्पिअन समुद्र-किनाऱ्याजवळील उत्तर भाग फार सुपीक आहे. एका तेलाखेरीज इतर खनिजद्रव्यें काय आहेत यांची माहिती फारशी उपलब्ध नाहीं. एकंदर लोकसंख्या १ कोटी २० लाख ते १ कोटी ८० लाख या दरम्यान आहे. पण त्यांत निरनिराळ्या वंशांच्या भटक्या टोळ्यांचा भरणा बराच आहे. देशांतील ८६ टक्यांच्या वर लोक शेती व गुरांचे कळप यांवर अवलंबून असतात. अर्थातच समाजाचा वरचा थर सोडल्यास बाकीची बहुसंख्य जनता दारिद्र्यांत बुडून गेलेली आहे. इराणच्या राजकारणांत अँग्लो–इराणियन तेल कंपनीच्या अधिकाऱ्यांचा बराच हात असतो असें म्हणतात. इराणमध्यें ब्रिटिश–अमेरिकन व रशियन सैन्यें सप्टेंबर १९४१ मध्यें आलीं. त्यानंतर कांहीं ब्रिटिश व अमेरिकन कंपन्यांनीं तेल काढण्याच्या सवलतीबद्दल इराण सरकारशीं गुप्तपणें बोलणीं चालू केलीं. त्याबद्दलची कुणकुण सो. रशियाला लागतांच त्या सरकारकडूनहि इराणकडे बोलणीं करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. आणि तेव्हांपासून हें तेलाचें राजकारण धुमसूं लागलें. तेल काढण्याच्या सवलतीबद्दल इराणशीं रशियानें वाटाघाटी करून ५० वर्षे मुदतीचे अधिकार मिळविले आहेत. रशिया व इराण हे देश नव्या कंपनींत भागीदार होतील व तेल निम्में–निम्में वाटून घेतील, अशा अटी ठरल्या आहेत.

### हिंदी अन्न-धान्य शिष्ट-मंडळाचें कार्य

वॉशिंग्टन येथें संयुक्त अन्न-धान्य समितीपुढें हिंदुस्थानच्या अन्न-धान्याच्या गरजेची कल्पना देण्याकरितां गेलेल्या हिंदी शिष्टमंडळाचे पुढारी सर रामस्वामी मुदलिआर हे हिंदुस्थानांत परत आले आहेत. त्यांनी शिष्टमंडळाच्या अमेरिकेंतील कार्याविषयीं माहिती देणारें एक पत्रक काढलें आहे. हिंदी शिष्टमंडळाने संयुक्त-धान्य-मंडळाकडे हिंदुस्थानसाठीं एकंदर १० लाख टन तांदूळ आणि ३० लाख टन गहू इतकी मागणी १९४६ सालासाठी केली होती. एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांत हिंदुस्थानची गरज विशेष निकडीची असल्यानें ५ लाख टन तांदूळ व २० लाख टन गहू येवढी मागणी तांतडीची म्हणून करण्यांत आली. पण संयुक्त-मंडळाने या तीन महिन्यांसाठी फक्त १ लाख ४५ हजार टन तांदूळ व १४ लाख टन गहू व मका येवढेंच धान्य मंजूर केलें म्हणजे मूळच्या मागणींत शेकडा ४० टक्के एवढी कपात केली. शिष्टमंडळ वॉशिंग्टनला पोचलें त्यावेळीं १९४६ च्या पहिल्या सहा महिन्यांसाठी म्हणून फक्त ४ लाख टनाला मान्यता देण्यांत आलेली होती. आतां दरमहा ४ लाख टन धान्य हिंदुस्थानांत आयात करण्याची व्यवस्था झाली आहे. तथापि चालू वर्षाच्या तिसऱ्या व चवथ्या तिमाहीबद्दल अजून कांहीं निर्णय घेण्यांत आलेले नाहींत. संयुक्त अन्न–धान्य मंडळाच्या तांदूळ–समितीवर हिंदुस्थानला प्रतिनिधित्व देण्यांत आलें असून प्रतिनिधी म्हणून वॉशिंग्टन येथील हिंदुस्थानचे एजंट सर गिरजा शंकर बाजपेय यांची नेमणूक करण्यांत आली आहे. याच समितीकडे धान्य वाटण्यासंबंधीं शिफारसी करण्याचें काम असतें. या दृष्टीनें ही नेमणूक महत्त्वाची आहे. हिंदुस्थानांतील तांदुळाच्या वाटपासंबंधी सर रामस्वामी मुदलियार यांनीं अशी सूचना केली कीं, उत्तर हिंदुस्थानांतील गहूं खाणाऱ्या प्रांतांनीं आपल्या प्रांतांतील तांदूळ, तांदूळ खाणाऱ्या व त्याचा तुटवडा असणाऱ्या प्रांतांना पाठवावा. दरम्यान ब्रिटिश सरकारने धान्यासंबंधीं एक शुभ्र–पत्रिका काढून ब्रिटन, हिंदुस्थान व साम्राज्यांतील इतर देश यांना संयुक्त मंडळाकडून देण्यांत येणाऱ्या मदतीबद्दल समाधान व्यक्त केलें आहे. ब्रिटिश पंतप्रधान मि. ॲटली यांनीं जर्मनी व जपान यांच्या आधीं हिंदुस्थानला अन्नपुरवठा झाला पाहिजे असें पार्लमेंटमध्यें प्रतिपादन केलें. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुनर्रचना समितीचे डायरेक्टर मि. गार्डिआ यांनीं लष्करापेक्षा शेतींत अधिक मनुष्यबळ गुंतविणें जरूरीचें आहे असें आग्रहानें जाहीर केलें आहे.

---

आदर्श कृषिसंस्था लि. धुळें—वरील कंपनी धुळें येथें स्थापन करण्यांत आली आहे. तिचे श्री. द. वि. जावडेकर हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. सर्व प्रकारची बागायती व शेती करणें, त्याची जोपासना करणें, त्याचप्रमाणें बागायतीवर व शेतीवर अवलंबून असलेले पोषक असे व्यवसाय करणें, इत्यादि कंपनीचे उद्देश आहेत. कंपनीनें प्रत्येकीं २५ रुपयांचे ४,००० भाग विक्रीस काढले आहेत.

## महाराष्ट्र-कर्नाटक प्रांताचा संक्रमण कालांतील (१८१८-६८) आर्थिक इतिहास (इंग्रजी)

(लेखक— प्रा. आर. डी. चोक्सी, वाडिया कॉलेज, पुणें. मिळण्याचें ठिकाण: डेक्कन बुकस्टॉल, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें. किंमत भाग १ ला, ८ रु., पृ. सं. ३६९ व भा. २ रा किं. ६ रु., पृ. सं. २४३. प्रस्तावना लेखक:-प्रि. ध. रा. गाडगीळ

(ले.:—प्रा. रा. वि. ओतुरकर)

या ग्रंथाचे लेखक गेलीं ६ वर्षे या विषयाचा प्रि. ध. रा. गाडगीळ यांचे मार्गदर्शकत्वाखालीं पीएच. डी. परीक्षेसाठी अभ्यास करीत होते. पहिल्या भागांत त्यांनीं आपला प्रबंध प्रसिद्ध केला असून दुसऱ्या भागांत त्यांनीं प्रबंधावर प्रकाश पाडणारीं इंग्रज अधिकाऱ्यांचीं मूळ पत्रें व्यवस्थित वर्गीकरण करून, पत्राचा विषय प्रारंभीं थोडक्यांत सूचित करून दिलीं आहेत व या दुसऱ्या भागालाही लेखकाने एक छोटी विषय-परिचयात्मक प्रस्तावना लिहिली असल्यानें हा दुसरा भागहि साधनग्रंथ म्हणून आपल्या परीने पूर्णच आहे.

संक्रमण कालांतील आर्थिक इतिहास या विषयावर आतांपर्यंत प्रि. ध. रा. गाडगीळ व सर रमेशचंद्र दत्त यांनीं ग्रंथ लिहिलेले असले तरी त्यांचे ग्रंथ सर्व हिंदुस्थानच्यासंबंधीं आहेत. सर रमेशचंद्र यांच्या ग्रंथाचा विषय आर्थिक इतिहासापुरता मर्यादित नाहीं. या ग्रंथांखेरीज श्री. पंडित यांनीं महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांचीच विद्यमान आर्थिक स्थिति या विषयावर एक निबंध लिहिला होता. त्याचें स्वरूप ऐतिहासिक व समालोचनपर नव्हतें. प्रा. चोक्सी यांच्या ग्रंथानें वाचकांस पुष्कळच महत्त्वाची माहिती नव्यानें व तपशीलवार मिळत आहे, तेव्हां या ग्रंथाच्या प्रसिद्धीनें एक महत्त्वाची उणीव दूर झाली आहे यांत शंका नाहीं.

संक्रमण कालांत राज्यकर्त्यांना महत्त्वाचा विषय सरकार-सारा व्यवस्थित बसविणें हा होता. कारण सरकारचें मुख्य उत्पन्न तेंच होतें व इतर कोणत्याहि बाबींपेक्षां सरकारसारा व तो गोळा करण्याची पद्धत या गोष्टीमुळें नव्या राजवटीची जाणीव लोकांस प्रामुख्यानें होणार होती. अशा वेळीं त्या खात्याची चोख व्यवस्था लावणें म्हणजेच जणूं काय नव्या राज्याची घडी बसविणें इतकें तें महत्त्वाचें काम होतें. प्रा. चोक्सी यांनी या कामीं एल्फिन्स्टन, प्रिंगेल, विंगेट वगैरे अधिकाऱ्यांनीं केलेल्या उद्योगाचें मोठ्या बारकाईनें वर्णन दिलें आहे. मि. बेडन पॉवेल यांच्या ग्रंथांतून या विषयाचें विवेचन आढळत असलें, तरी प्रा. चोक्सी यांनी ज्याप्रमाणें जागजागीं राज्यकर्त्यांवर चिकित्सक, गुणग्राहक, व दोषदर्शक टीका केली आहे तशी ती बेडन पॉवेलच्या ग्रंथांत आढळत नाहीं.

या मुलकी कारभाराच्या नव्या व्यवस्थेचा ग्रामपंचायतीवर झालेला परिणाम लेखकाने एका स्वतंत्र भागांत वर्णिला आहे. याखेरीज तत्कालीन वहातुकीचे मार्ग, सुती व रेशमी कापडाचा धंदा, चलन, काळे, एकंदर परिस्थिति या विषयावर एक एक भाग लिहिला आहे. ग्रंथाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्र व उत्तरार्धांत कर्नाटक अशा रीतीने दोन प्रांतांतील आर्थिक परिस्थितीचें स्वतंत्र वर्णन आहे.

महाराष्ट्र-कर्नाटकाच्या आर्थिक परिस्थितीचा इतिहास लिहिण्यासाठी ग्रंथकाराने घेतलेले परिश्रम कौतुकास्पद असले तरी "लँड रेकॉर्ड ऑफिस व पेशवा दप्तर येथें उपलब्ध असलेल्या सर्व साहित्याचा पुरेपूर उपयोग करण्यांत यत्किंचितहि कसूर करण्यांत आलेली नाहीं." (No effort has been spared to make a *thorough study of all* material available at the Land Records Office and the Peshwa Daftar) ही लेखकाची प्रतिज्ञा अतिव्याप्तीच्या दोषास पात्र आहे हें पेशवे दप्तराचा प्रचंडपणा माहीत असणारांस कबूल करावें लागेल. खेरीज, पेशवे दप्तरांतील जमाव-विभागांतील मोडी कागदपत्रांच्या नकला करून घेऊन त्यांतील माहितीचा लेखकानें कितपत उपयोग केला आहे तें कळत नाहीं. इंग्रजी दप्तर मात्र लेखकाने बरेंच कसोशीनें पाहिलें आहे यांत शंका नाहीं. इंग्रजांचा महाराष्ट्रावर अंमल बसविण्याचा यत्न हा आंग्ल राजकीय विचारप्रणालीचा एतद्देशीय परिस्थितीवरील प्रयोग आहे हें लक्षांत घेऊन एतद्देशीय राज्यविषयक कल्पनांतील विधायक भाग कोणता, तो अखेरच्या कालांत कसा बिघडला व इंग्रजांनीं आपल्या तत्कालीन राजकीय व आर्थिक तत्त्व-सिद्धांताचा या देशावर अंमल बसविण्याचा हव्यास धरल्यानें मूळ एतद्देशीय घडी कशी उखडली गेली, या विषयाचें विवेचन समाधानकारक झालें आहे असें म्हणवत नाहीं. सारांश, तपशीलाच्या घडामोडीमागें असलेलें 'तत्त्वांचें द्वंद्व' लेखकास गवसलेलें दिसत नाहीं. इतकेंच काय, पण मराठ्यांच्या राज्यपद्धतींतील किंवा वसूलपद्धतींतील विधायक भागाचा पुरेसा परिचय लेखकाने करून घेतला आहे असें म्हणवत नाहीं. एका अर्थी हें साहजिकहि आहे. कारण, मराठेशाहीच्या विनाशकालीन कारभाराचें वर्णन वाचणाराचा त्या राज्यपद्धतीबद्दल प्रतिकूलच ग्रह उत्पन्न होणार. कित्येक वेळां ग्रंथांत परस्परविरोधी विधानें दृष्टीस पडतात. पहिल्या भागाच्या पृ. ८६ वर लेखकानें खेडेगांवाच्या दुर्दशेच्या कारणाबद्दल राज्यकर्त्यांस दोष देतांना असें लिहिलें आहे: "स्वार्थीपणा, सहानुभूतीचा अभाव, खेडेगांवांच्या हिताबद्दल अनास्था किंवा गैरमाहिती, आणि त्यांतच जें जें हिंदी असेल त्याबद्दल तुच्छतेची भावना, हीं अपयशाचीं बीजें होतीं."

(The seeds (of failure) were selfishness, lack of sympathy, little desire or understanding of the village welfare...... not to mention a contempt for all that was Indian.) परंतु दुसऱ्या भागास प्रस्तावना लिहितांना लेखक राज्यकर्त्यांची पुढीलप्रमाणें प्रशंसा करतात: "त्यांस अपयश आलें, तरी त्यांची उद्योगप्रियता, सहानुभूति आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वांच्या सुखाबद्दल त्यांस वाटणारी कळकळ हीं पदोपदीं दिसून येतात, हें नाकबूल करणें म्हणजे त्यांस अन्याय करणें होईल."

(But in spite of their failure......be it said in justice that we have before us ample evidence of industry, sympathy and above all a genuine desire on their part to work for the happiness of all concerned.)

या संक्रमण कालांतील आर्थिक इतिहासांतून मुंबईस सुरू झालेल्या नव्या गिरण्यांचा उल्लेख वगळला गेलेला दिसतो. तसेंच औद्योगिक स्थित्यंतराचा देशांतील अठरापगड धंदेवाइकांवर तपशीलाने कसकसा परिणाम होत गेला याचें समालोचन करणें अवश्य होतें. उदाहरणार्थ, अंदाजें किती शिपाई घरीं बसले, किती हुजरे किंवा दासदासी बेकार झाले, ग्रामपंचायतींतील निरनिराळ्या तेली, सुतार, चांभार, कुंभार, जोशी यांपैकी कुणावर संक्रमणाचा विशेष प्रतिकूल परिणाम झाला अशी माहिती मिळावयास हवी. पण यासाठी साधनें जितकीं भरपूर हवीं तितकीं प्रा. चोक्सी यांस मिळालीं नाहींत असें प्रि. गाडगीळ यांनीं म्हटलें आहे तेंच खरें आहे. प्रा. चोक्सी यांचा विद्यमान ग्रंथ हा ब्रिटिश राजवटीचें प्रारंभींचें दप्तर काळजीपूर्वक अभ्यासून

त्यावरून दख्खन कर्नाटकचें वर्णन करणारा आहे. संक्रमण काल असा तोडून विषय घेतल्यानें मराठ्यांच्या विनाश-कालांतील विपरीतता व इंग्रजांच्या राज्यस्थापनाकालांतील दक्षता व परिश्रम यांचें यांत चांगलें चित्रण आहे. या कालावर लिहिणाऱ्या पुढील लेखकास या ग्रंथाची दखलगिरी घेतल्या-खेरीज पुढें जातां यावयाचें नाहीं. किंबहुना या ग्रंथाच्या वाचनानें त्यास बरेंच साहित्य तयार असें मिळेल. ग्रंथ वाचीत असतां लेखकाच्या उद्योगशीलतेचें कौतुक वाटल्याखेरीज रहात नाहीं. लेखकास मराठी कितपत समजतें तें माहीत नाहीं, पण मराठी चांगलें समजणारास देखील कित्येक शब्द व कल्पना अपरिचित व दुर्बोध वाटणाऱ्या आहेत, त्यांची लेखकानें परिश्रमपूर्वक फोड केली आहे. पी एच.डी. सारख्या पदवीसाठी अभ्यास करणाऱ्यांस विद्वत्ता व परिश्रम यांचा परिपाक कोणत्या पल्ल्यापर्यंत पोहोंचवावा लागतो याची कांहीं कल्पना या ग्रंथाच्या वाचनानें येईल.

**कै. शं. गो. देवधर : शोकप्रदर्शन**

**पालघरः**—प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजर, श्री. शं. गो. देवधर, ह्यांच्या अकाली निधनानिमित्त दुखवटयाची सभा पालघर येथें विविध सहकारी संस्थांच्या विद्यमानें बँकेच्या शाखा कचेरींत श्री. वि. वा. उर्फ बाबूराव दांडेकर, एम. एल. सी., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार, ता. ३१ मार्च रोजीं भरली होती. अध्यक्षांनीं कै. देवधर ह्यांच्या कर्तबगारीबद्दल गौरवपर उल्लेख केला आणि सध्याच्या संक्रमणकाळांत सहकारी चळवळीचें आणि तीमधील कामसू कार्यकर्त्यांचें महत्त्व विशद केलें.

**सातारा:**—बँकेचे सातारा येथील कायदेशीर सल्लागार श्री. के. बा. गजेंद्रगडकर वकील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं शनिवार, ता. ३० मार्च रोजीं सभा झाली.

**नगरः**—नगर सेंट्रल बँकेचे दिवाणखान्यांत बँकेचे चेअरमन श्री. व्यं. श्री. ऊर्फ काकासाहेब चिंचोरकर यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ३ एप्रिल रोजीं सभा झाली.

**लंकेची लोकसंख्या २५ टक्के वाढली**—१९३१ मध्यें लंकेची लोकसंख्या ५३ लाखांच्या वर होती ती आतां ६६½ लाखांच्यावर गेली आहे. लंकेंतील सर्वांत मोठें शहर कोलंबो ह्याची लोकसंख्या आतां ३½ लाखांवर आहे.

**ब्रिटन आपली रहाणी आणखी उच्च करणार**—मि. हरबर्ट मॉरिसन, लॉर्ड प्रेसिडेंट ऑफ कौन्सिल, यांनीं सांगितलें कीं, ब्रिटिश लोकांना आपली रहाणी अधिक उच्च करण्याची संधि आतां आली आहे. ते म्हणाले, "अद्याप आपली आयात निर्यातीपेक्षां जास्त आहे. परंतु वर्ष अखेर १५ लाख लोक निव्वळ निर्यात मालाच्या उत्पादनाकरितां आपणाजवळ मोकळे होतील. त्यांचा उपयोग यथा-योग्य करून, जगांतल्या तुटवड्याचा फायदा घेऊन, निर्यात वाढवून, आपली उत्पादनशक्ति वाढविली पाहिजे."

## पाहिजेत

मॅनेजर किंवा अकाऊंटंटसाठी बी. कॉम अगर सेल सोसायट्यांच्या हिशेबाची माहिती असलेले इसम पाहिजेत. गरजूंनीं नांव, गांव, जात, वय, शिक्षण, लायकी, अनुभव, हल्लीं काय करीत आहे, पगार काय घेणार, वगैरेसंबंधी माहितीपूर्ण अर्ज खालील पत्त्यावर लवकर करावेत.

डी. ए. पाटील
मॅनेजिंग डायरेक्टर
सटाणा को. ऑ. सीड सप्लाय अँड सेल
सोसायटी लि. जि. नाशिक.








घोडा छाप
शाईच्या पुड्या
★ दांडेकर कंपनी मुंबई २८. ★

आर्को
निलगिरी
एरंडेल

# मुंबई शेअर बाजार

वर्गं पुस्तकें बंद

नागपूर ५–४–४६ } २०–४–४६ }
स्वदेशी मिल्स १२–४–४६ } ४–५–४६ }

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा

+डाइंग रु. ५० दि. ८–४–४६
+गोकाक रु. ८ दि. ८–४–४६
नागपूर रु. ५ दि. २९–४–४६
स्वदेशी रु. २२ दि. १५–५–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २।४।४६ | बुधवार ३।४।४६ | गुरुवार ४।४।४६ | शुक्रवार ५।४।४६ | सोमवार ८।४।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २९९२—८ | ३००५—० | २९६७—८ | २९४२—८ | २९२७—८ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५२७—० | ५३१—८ | ५२३—८ | ५२०—० | ५२०—० |
| २२२९-८; १७६१-१२ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २४११—४ | २४२७—८ | २४०५—० | २४०१—४ | २३५१—४+ |
| ७०२; ५६६ | १९—–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ८१४—० | ८२३—० | ८११—० | ८१३—० | ८२१—० |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७३८—८ | ७४९—० | ७४८—० | ७५८—० | ७५९—० |
| ४४३-८; ३६० | ५–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४७२—० | ४७२—८ | ४६६—८ | ४६६—० | ४६६—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३८९—० | ३९०—८ | ३८४—० | ३८२—० | ३८५—० |
| ३३५; २८३-८ | ८–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३६१—० | ३६४—८ | ३६०—० | ३६१—० | ३५३–०+ |
| ३३७; २४३ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३८६—० | ३८८—८ | ३८४—८ | ३८२—८ | ३८१—८ |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—३–३ | ५—२–० | ५—२–० | ५—२–० | ५—३–० |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २०—० | २०—९ | २०–१–६ | २०—० | २०—८ |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३–१५–० | ४—० | ३–१४–६ | ३–१४–६ | ३—१५–६ |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८०२—८ | ८०६—४ | ७९७—८ | ७९२—८ | ७९२—८ |
| २४३-८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २५७—८ | २५८—४ | २५५—८ | २५०—८ | २५१—० |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २८३—० | २८६—० | २८०—० | २७७—० | २७८—० |
| ५९२-८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६२८–१२ | ६३०—० | ६२५—० | ६२२—८ | ६२५—० |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३८–१३ | ३९—२ | ३८–१२ | ३८—६ | ३८—३ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—७ | १०३–६–६ | १०३–२–६ | १०३—१ | १०३—३ |

सोमवार दि. ८–४–४६ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०१—९ |
| १९५१–५४ | १०२—२ |
| १९५७ | १०२—८ |
| १९५९–६१ | १०२—८ |
| १९६३–६५ | १०२–१० |
| १९६६–६८ | १०२—६ |
| १९७०–७५ | १०२–१० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १८२—८ |
| सेंट्रल | १२४—४ |
| इंडिया | २३८—० |
| इंपी० | २४९०—० |
| | ६४०–० |
| रिझर्व्ह | १७०—० |
| युनियन | १५—४ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८८०–० |
| बॉम्बे ट्रॅम | १५८–० |
| टाटा हायड्रो | २२२–० |
| टाटा पॉवर | १९८३–१२ |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४७५—० |
| बॉंबे स्टीम | ६६०—० |
| न्यू इंडिया | ११७—८ |
| शिवराजपुर | ५७—० |
| टाटा केमिकल | २६—८ |
| टाटा ऑईल | १२१—८ |

बुधवार दि. १०–४–४६ ला रामनवमीनिमित्त बाजार बंद आहे.













ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

**ओलक शिवण्याचीं यंत्रें**

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटाः—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

—दररोज वापरण्यासाठीं लागणारें—

**लोणी आणि चक्का**

खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील
—प्रमुख ठिकाण—
बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.

शांतीलाल भगवानदास

**टोप्यांचे व्यापारी**

खास लग्नसराईकरितां हायक्लास रेडिमेड ब्लाऊज, फ्रॉक्स, पेटीकोट्स, बाबासूट व पंजाबी ड्रेस तयार मिळतील.
लेडीजचें शिलाईकाम वेळेवर करून मिळेल.
१७० बुधवार पेठ, पुणें २

**बिनचूकच्या माहितीनें**

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
——— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ———

भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें
—आदर्श ठिकाण—


**चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स् लिमिटेड**

मॅनेजिंग एजंटसः—चितळे ब्रदर्स
रजिस्टर्ड ऑफिस—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.
वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८

**पैसा आणि ज्ञान वाढवा !**

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.
—आजच लिहा—
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें